गृह विभाग -कारागृह व सुधारसेवा विभाग :
६९०९ पदांचा सुधारित आकृतिबंध.

# महाराष्ट्र शासन
# गृह विभाग

**शासन निर्णय - संगणक क्र.१५९२३६१/२०२६/तुरुंग-१**
दुसरा मजला, मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १२ ऑक्टोबर २०२६

**वाचा :**
१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.असंक-१००१/प्र.क्र.२१/२००१/वित्तीय सुधारणा, दि.१०/०९/२००१.
२) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.जेएलडी-३५९७/४९/प्र.क्र.२२९/भाग-२/पीआरएस-१, दिनांक १२/०९/२००३.
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.पदनि-०६१७/प्र.क्र.२०/आपुक, दि.२९/०६/२०१७.
४) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.जेएलई-१११५/१८८३/प्र.क्र.३८०/तुरुंग-१,
दिनांक १२/०८/२०२२.
५) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.जेएलई-०७२२/प्र.क्र.१७३/तुरुंग-१, दिनांक ०६/१०/२०२३.
६) उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि.३०/०६/२०२६ रोजीच्या बैठकीचे (०७/२०२६) इतिवृत्त.

**प्रस्तावना :-**

संदर्भ क्र.४ व ५ येथील शासन निर्णयानुसार, कारागृह व सुधारसेवा विभागाच्या आस्थापनेवर एकूण ८८ संवर्ग आणि ७०६७ इतकी पदे निर्माण करण्यात आली.

२. कारागृह व सुधारसेवा विभागाच्या आस्थापनेवरील ८८ संवर्गांची संख्या, प्रशासकीय सोय आणि आवश्यकता, यांस अनुसरुन, जेवढी आवश्यक आहे, तेवढेच संवर्ग कार्यरत ठेवणे आवश्यक आहे. कारागृह व सुधारसेवा विभागातील ८८ संवर्गातील काही संवर्ग एकाकी आणि कालबाह्य ठरणारे असल्याने, सदर संवर्ग मृत घोषित करणे आवश्यक असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले.

३. काही संवर्गातील पदे इतर विभागाकडून प्रतिनियुक्तीने भरल्यास अनुभवी अधिकारी व कर्मचारी उपलब्ध होतील. काही संवर्गाच्या पदनामातील द्विरुक्ती टाळण्यासाठी, काही संवर्गांच्या पदनामाचे इतर विभागातील पदनामांशी साधर्म्य साधण्यासाठी आणि त्यात अधिक सुस्पष्टता आणण्यासाठी सदर पदनामांमध्ये बदल करण्याची आवश्यकता असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले.

४. सामान्य प्रशासन विभागानेदेखील भविष्यातील पदभरतीच्या सुलभतेकरिता कालबाह्य, एकाकी आणि अनावश्यक संवर्ग-पदे यांचा आढावा घेऊन सदर संवर्गांचे एकत्रिकरण *[Cadre Club]* करण्याबाबत निर्देशित केले आहे. कारागृह व सुधारसेवा विभागाच्या आस्थापनेवर “वैद्यकीय अधिकारी, श्रेणी-२ [वेतनश्रेणी-एस-१६, पदसंख्या-२८]” आणि “वैद्यकीय अधिकारी, श्रेणी-३ [वेतनश्रेणी-एस-१५, पदसंख्या-४८]” या दोन संवर्गासाठी, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आस्थापनेवर वेतनश्रेणीत कोणतीही पदे उपलब्ध नसल्याने, उक्त दोन्ही संवर्ग मृत घोषित करण्यात

आले आहेत. प्रतिनियुक्तीच्या सुलभलेकरीता, या दोन संवर्गातील ७६ पदे, “वैद्यकीय अधिकारी, श्रेणी-१ [वेतनश्रेणी-एस-२०]” या संवर्गात रुपांतरित करण्यात आली आहेत. एकूण वैद्यकीय अधिका-यांच्या पदसंख्येत काहीही बदल करण्यात आलेला नाही.

५. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, कारागृह व सुधारसेवा विभागाच्या आस्थापनेवर सध्या अस्तित्वात असलेल्या ८८ संवर्ग आणि त्यातील ७०६७ पदांचा आढावा घेऊन सुधारित, सुस्पष्ट आणि आवश्यक संवर्गसंख्या-पदसंख्या असलेला आकृतिबंध निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

६. कारागृह विभागातील अधिकारी-कर्मचारी यांना पोलीस विभागातील वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबतचा संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णय, याद्वारे, अधिक्रमित करण्यात येत आहे.

**<u>शासन निर्णय</u> :-**

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीने दि.३०/०६/२०२६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेस अनुलक्षून,-

| | |
|---|---|
| (१) | कारागृह व सुधारसेवा विभागाच्या आस्थापनेवर सध्या अस्तित्वात असलेल्या ८८ संवर्गाची संख्या, प्रशासकीय सोय आणि आवश्यकता, यांस अनुसरुन, जेवढी आवश्यक आहे, तेवढेच संवर्ग कार्यरत ठेवले आहेत. त्या अनुषंगाने एकूण **३४ संवर्ग** [कार्यकारी संवर्ग : ११, प्रशासकीय संवर्ग : ०४ व प्रतिनियुक्तीचे संवर्ग : १९] आणि एकूण पदसंख्या **६९०९** इतकी करण्यास, याद्वारे, शासन मान्यता देण्यात येत आहे [**विवरणपत्र-१**]. |
| (२) | पदनामांतील द्विरुक्ती टाळण्यासाठी, काही संवर्गाच्या पदनामाचे इतर विभागातील पदनामांशी साधर्म्य साधण्यासाठी आणि त्यात अधिक सुस्पष्टता आणण्यासाठी ०८ संवर्गाच्या पदनामांत बदल करण्यास, याद्वारे, शासन मान्यता देण्यात येत आहे [**विवरणपत्र-२**]. |
| (३) | कारागृह व सुधारसेवा विभागाच्या आस्थापनेवर “वैद्यकीय अधिकारी, श्रेणी-२ [वेतनश्रेणी-एस-१६, पदसंख्या-२८]” आणि “वैद्यकीय अधिकारी, श्रेणी-३ [वेतनश्रेणी-एस-१५, पदसंख्या-४८]” या दोन संवर्गासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आस्थापनेवर वेतनश्रेणीत कोणतीही पदे उपलब्ध नसल्याने, उक्त दोन्ही संवर्ग मृत घोषित करण्यात येत आहेत. प्रतिनियुक्तीच्या सुलभतेकरीता, हे दोन संवर्ग “वैद्यकीय अधिकारी, श्रेणी-१ [वेतनश्रेणी-एस-२०]” या संवर्गात रुपांतरित करुन, वैद्यकीय अधिकारी यांची एकूण पदसंख्या पूर्वीप्रमाणेच ७९ ठेवण्यात आली आहे. |
| (४) | कारागृह व सुधारसेवा विभागाच्या आस्थापनेवरील एकाकी आणि सध्याच्या तंत्रज्ञानाच्या कालखंडात कालबाह्य ठरणारे ५२ संवर्ग आणि त्यातील १५८ पदे मृत घोषित करण्यास, याद्वारे, शासन मान्यता देण्यात येत आहे [**विवरणपत्र-३**]. |
| (५) | प्रतिनियुक्तीद्वारे भरली जाणारी सर्व पदे, त्यांच्या मूळ संवर्गात (Parent Cadre) अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणीनुसार वेतनास पात्र असतील. |

२. कारागृह व सुधारसेवा विभागाच्या सुधारित आकृतिबंधातील ३४ संवर्गांचा व पदसंख्येचा गटनिहाय तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| **गट** | **संवर्ग संख्या** | **पदसंख्या** |
|---|---|---|
| गट अ | १२ | १५२ |
| गट ब (राजपत्रित) | ०४ | ७२ |
| गट ब (अराजपत्रित) | ०४ | ४९ |
| गट क | १४ | ६६३६ |
| **एकूण** | **३४** | **६९०९** |

३. कारागृह व सुधारसेवा विभागाच्या आस्थापनेवरील मृत घोषित करण्यात आलेल्या ५२ संवर्गातील रिक्त पदे तात्काळ प्रभावाने मृत होतील. तसेच, या संवर्गातील सध्या भरलेली पदे, त्यावर कार्यरत अधिका-यांच्या सेवानिवृत्ती/सेच्छासेवानिवृत्ती/राजीनामा/इतर कारणांमुळे होणा-या रिक्ततेच्या दिनांकापासून, तात्काळ प्रभावाने मृत होतील.

४. याबाबतचा होणारा खर्च, लेखाशीर्ष मागणी क्रमांक बी-५, मुख्य लेखाशीर्ष २०५६ तुरुंग (००) ००१ संचालन व प्रशासन (००) (०१) कारागृह महानिरीक्षणालय (२०५६ ००२६) दत्तमत (०१) वेतन, (००) ००१ तुरूंग (००) (०१) मध्यवर्ती तुरूंग (२०५६ ००३५) दत्तमत (०१) वेतन, (००) ००१ तुरूंग (००) (०२) जिल्हा तुरूंग (२०५६ ००४४) दत्तमत (०१) वेतन, (००) (००१) तुरूंग (००) (०३) इतर तुरूंग (२०५६ ००५३) दत्तमत (०१) वेतन या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून, त्या-त्या आर्थिक वर्षात मंजूर होणा-या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समिती [दि.३०/०६/२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त], वित्त विभाग [अनौपचारिक संदर्भ क्र.१९९/आ.पु.क., दिनांक ०५/१०/२०२६] व सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेस अनुलक्षून हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०१२११२७३७२३२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUGRIV SAMBHAJI DHAPATE

Digitally signed by SUGRIV SAMBHAJI DHAPATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FC102DE27DC1B41E747AC6CBB491C4209459C3CF340720EA98FD1D95B19C9F65, cn=SUGRIV SAMBHAJI DHAPATE
Date: 2026.10.12 11:34:56 +05'30'

**(सुग्रिव धपाटे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री, गृह (शहरे/ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) अपर मुख्य सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) अपर मुख्य सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६) संचालक, अभियोग संचालनालय, मुंबई.
१७) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१८) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
१९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२१) निवड नस्ती, तुरुंग-१.

**********

## विवरणपत्र-१ : कारागृह व सुधारसेवा विभागाच्या सुधारित आकृतिबंधाचा तपशील

| अ. क्र. | संवर्गाचे नाव | गट | वेतन संरचना [७ व्या आयोगानुसार] | उच्चस्तरीय सचिव समितीने मंजूर केलेला सुधारित आकृतिबंध |
|---|---|---|---|---|
| १ | Additional Director General of Prisons and Correctional Services<br>अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य | भा.पो.से. संवर्ग पद | भा.पो.से. संवर्ग पद | ०१ |
| २ | Special Inspector General of Prisons and Correctional Services<br>विशेष महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा | अ | To be notified | ०१ |
| ३ | Deputy Inspector General of Prisons and Correctional Services<br>उप महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा | अ | To be notified | ०५ |
| ४ | Superintendent of Prisons and Correctional Services<br>अधीक्षक, कारागृह व सुधारसेवा | अ | एस-२५<br>रू.७८८००-२०९२०० | १२ |
| ५ | Additional Superintendent of Prisons and Correctional Services<br>अतिरिक्त अधीक्षक, कारागृह व सुधारसेवा | अ | एस-२३<br>रू.६७७००-२०८७०० | २९ |
| ६ | Deputy Superintendent of Prisons and Correctional Services<br>उप अधीक्षक, कारागृह व सुधारसेवा | ब (राजपत्रित) | एस-१८<br>रू.४९१००-१५५८०० | ४७ |
| ७ | Jailor<br>तुरुंग अधिकारी | क | एस-१५<br>रू.४१८००-१३२३०० | १५१ |
| ८ | Deputy Jailor<br>उप तुरुंग अधिकारी | क | एस-१४<br>रू.३८६००-१२२८०० | ४१३ |
| ९ | Assistant Jailor<br>सहायक तुरुंग अधिकारी | क | एस-१०<br>रू.२९२००-९२३०० | २२४ |
| १० | Hawaldar<br>हवालदार | क | एस-८<br>रू.२५५००-८११०० | ८४३ |
| ११ | Prison Guard<br>कारागृह शिपाई | क | एस-७<br>रू.२१७००-६९१०० | ४३३४ |
| १२ | Administrative Officer<br>प्रशासन अधिकारी | ब (राजपत्रित) | एस-१५<br>रू.४१८००-१३२३०० | २३ |

| अ. क्र. | संवर्गाचे नाव | गट | वेतन संरचना [७ व्या आयोगानुसार] | उच्चस्तरीय सचिव समितीने मंजूर केलेला सुधारित आकृतिबंध |
|---|---|---|---|---|
| १३ | Office Superintendent<br>कार्यालय अधीक्षक | ब<br>(अराजपत्रित) | एस-१४<br>रू.३८६००-१२२८०० | ४१ |
| १४ | Senior Clerk cum Typist<br>वरिष्ठ लिपिक - टंकलेखक | क | एस-८<br>रू.२५५००-८११०० | १५६ |
| १५ | Junior Clerk cum Typist<br>कनिष्ठ लिपिक - टंकलेखक | क | एस-६<br>रू.१९९००-६३२०० | २९० |
| अ.क्र. ३ येथील उप महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा [Deputy Inspector General of Prisons and Correctional Services], हे पद पदोन्नती व प्रतिनियुक्तीने भरले जाईल. | | | | |

**प्रतिनियुक्तीने भरावयाची पदे :-**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | Deputy Superintendent of Police<br>पोलीस उप अधीक्षक | अ | एस-२०<br>रू.५६१००-१७७५०० | ०१ |
| १७ | Police Inspector<br>पोलीस निरीक्षक | अ | एस-१८<br>रू.४९१००-१५५८०० | ०१ |
| १८ | Police Sub Inspector<br>पोलीस उप निरीक्षक | ब<br>(अराजपत्रित) | एस-१४<br>रू.३८६००-१२२८०० | ०६ |
| १९ | Psychologist<br>मानसशास्त्रज्ञ | अ | एस-२३<br>रू.६७७००-२०८७०० | १२ |
| २० | Psychiatrist<br>मनोविकृती शास्त्रज्ञ | अ | एस-२३<br>रू.६७७००-२०८७०० | ०९ |
| २१ | Medical Officer, Grade-I<br>वैद्यकीय अधिकारी, श्रेणी-१ | अ | एस-२०<br>रू.५६१००-१७७५०० | ७९ |
| २२ | Compounder<br>मिश्रक | क | एस-१०<br>रू.२९२००-९२३०० | ६८ |
| २३ | Laboratory Technician<br>प्रयोगशाळा तंत्रज्ञ | क | एस-१०<br>रू.२९२००-९२३०० | १६ |
| २४ | Male Nurse<br>परिचारक | क | एस-८<br>रू.२५५००-८११०० | ७७ |
| २५ | Superintendent of Prisons Industry<br>अधीक्षक, तुरुंग उद्योग | अ | एस-२०<br>रू.५६१००-१७७५०० | ०१ |
| २६ | Teacher<br>शिक्षक | क | एस-८<br>रू.२५५००-८११०० | ३६ |
| २७ | Supervisor (Agriculture)<br>कृषी पर्यवेक्षक | क | एस-१३<br>रू.३५४००-११२४०० | ०९ |
| २८ | Agriculture Assistant<br>कृषी सहायक | क | एस-८<br>रू.२५५००-८११०० | १६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २९ | Deputy Engineer<br>उप अभियंता | अ | एस-२०<br>रू.५६१००-१७७५०० | ०१ |
| ३० | Law Officer<br>विधि अधिकारी | ब<br>(राजपत्रित) | एस-१६<br>रू.४४९००-१४२४०० | ०१ |
| ३१ | Statistics Officer<br>सांख्यिकी अधिकारी | ब<br>(अराजपत्रित) | एस-१५<br>रू.४१८००-१३२३०० | ०१ |
| ३२ | Assistant Statistician<br>सांख्यिकी अन्वेषक | क | एस-८<br>रू.२५५००-८११०० | ०३ |
| ३३ | Accounts Officer<br>लेखा अधिकारी | ब<br>(राजपत्रित) | एस-१६<br>रू.४४९००-१४२४०० | ०१ |
| ३४ | Assistant Accounts Officer<br>सहायक लेखा अधिकारी | ब<br>(अराजपत्रित) | एस-१५<br>रू.४१८००-१३२३०० | ०१ |
| **एकूण** | | | | **६९०९** |

---

## विवरणपत्र-२ : पदनामांतील बदलाचा तपशील

| अ.क्र. | सध्याचे पदनाम | सुधारित पदनाम |
|---|---|---|
| १ | **Superintendent , Central Prisons**<br>अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह | **Superintendent of Prisons and Correctional Services,**<br>अधीक्षक, कारागृह व सुधारसेवा |
| २ | **Additional Superintendent, Central Prison/ Superintendent, District Prison - Class I**<br>अतिरिक्त अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह/<br>अधीक्षक, जिल्हा कारागृह (वर्ग १) | **Additional Superintendent of Prisons and Correctional Services**<br>अतिरिक्त अधीक्षक, कारागृह व सुधारसेवा |
| ३ | **Deputy Superintendent, Central Prison/ Superintendent, District Prison – Class II**<br>उप अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह/<br>अधीक्षक, जिल्हा कारागृह (वर्ग २) | **Deputy Superintendent of Prisons and Correctional Services**<br>उप अधीक्षक, कारागृह व सुधारसेवा |
| ४ | **Jailor, Group-I**<br>तुरुंग अधिकारी, श्रेणी १ | **Jailor**<br>तुरुंग अधिकारी |
| ५ | **Jailor, Group -II**<br>तुरुंग अधिकारी, श्रेणी २ | **Deputy Jailor**<br>उप तुरुंग अधिकारी |
| ६ | **Subhedar**<br>सुभेदार | **Assistant Jailor**<br>सहायक तुरुंग अधिकारी |
| ७ | **Senior Clerk**<br>वरिष्ठ लिपिक | **Senior Clerk cum Typist**<br>वरिष्ठ लिपिक - टंकलेखक |
| ८ | **Clerk**<br>लिपिक | **Junior Clerk cum Typist**<br>कनिष्ठ लिपिक - टंकलेखक |

## विवरणपत्र-३ : मृत संवर्गांचा तपशील

| अ.क्र. | मृत संवर्गाचे नाव | मृत संवर्गाची घोषित पदसंख्या |
|---|---|---|
| १ | Superintendent of Textile Industry - अधीक्षक, वस्त्रोद्योग | ०१ |
| २ | Textile Foreman - वस्त्रनिर्माण कार्यादेशक | ०७ |
| ३ | Jobber cum Textile Demonstrator - वस्त्रनिर्माण प्रयोगनिदेशक | ०६ |
| ४ | Supervisor (Weaving) - विणकाम पर्यवेक्षक | ०३ |
| ५ | Warper - ताणाकार | ०६ |
| ६ | Hoziery - होजीअरी | ०१ |
| ७ | Preparatory - प्रिपेरेटरी | ०१ |
| ८ | Supervisor (Milling) - मिलींग पर्यवेक्षक | ०१ |
| ९ | Instructor (Carpet Weaving) - निदेशक पंजा व गालीचा | ०१ |
| १० | Instructor (Weaving) - विणकाम निदेशक | ०५ |
| ११ | Instructor (Knitting & Weaving) - क्निटींग व विव्हिंग निदेशक | ०३ |
| १२ | Instructor (Printing) - छपाई निदेशक | ०१ |
| १३ | Supervisor (Tailoring) - शिवणकाम पर्यवेक्षक | १० |
| १४ | Supervisor (Carpentry) - सुतारकाम पर्यवेक्षक | ०४ |
| १५ | Supervisor (Leather) - चर्मकला पर्यवेक्षक | ०२ |
| १६ | Supervisor (Paper) - कागदकाम पर्यवेक्षक | ०१ |
| १७ | Supervisor (Smithy) - लोहारकाम पर्यवेक्षक | ०३ |
| १८ | Supervisor (Chemical) - रसायन पर्यवेक्षक | ०१ |
| १९ | Instructor (Smithy) - लोहारकाम निदेशक | ०३ |
| २० | Machinist - यंत्र निदेशक | ०३ |
| २१ | Instructor (Turner) - कातारी | ०३ |
| २२ | Instructor (Fitter) - जोडारी | ०१ |
| २३ | Instructor (Tailoring) - शिवणकाम निदेशक | १३ |
| २४ | Instructor (Braille) - ब्रेल निदेशक | ०१ |
| २५ | Instructor (Masonry) - गवंडी निदेशक | ०१ |
| २६ | Instructor (Bakery) - बेकरी निदेशक | ०८ |
| २७ | Instructor (Leather) - चर्मकला निदेशक | ०३ |
| २८ | Instructor (Paper-making) - कागदकाम निदेशक | ०१ |
| २९ | Electrician - वीजतंत्री | ०१ |
| ३० | Instructor (Carpentry) - सुतारकाम निदेशक | ११ |
| ३१ | Sawyer - करवत्या | ०३ |
| ३२ | Instructor (Lacquer) - लाखकाम निदेशक | ०१ |
| ३३ | Head Master- मुख्याध्यापक | ०१ |
| ३४ | House Master - गृह पर्यवेक्षक | ०३ |
| ३५ | Physical Training Instructor - शारीरिक कवायत निदेशक | ०१ |
| ३६ | Physical Education Instructor - शारीरिक शिक्षण निदेशक | ०१ |

| अ.क्र. | मृत संवर्गाचे नाव | मृत संवर्गाची घोषित पदसंख्या |
|---|---|---|
| ३७ | Technical Officer (Agriculture) - तंत्र अधिकारी (शेती) | ०१ |
| ३८ | Research Officer - संशोधन अधिकारी | ०१ |
| ३९ | Senior Administrative Officer - वरिष्ठ प्रशासन अधिकारी | ०१ |
| ४० | Statistician - सांख्यिकी | ०१ |
| ४१ | Personal Assistant (Stenographer cadre) - स्वीय सहायक (लघुलेखक संवर्ग) | ०१ |
| ४२ | Stenographer (H.G) - लघुलेखक (उच्च श्रेणी) | ०१ |
| ४३ | Stenographer (L.G) - लघुलेखक (निम्न श्रेणी) | ०७ |
| ४४ | Naik - नाईक | ०१ |
| ४५ | Dafterband - दफ्तरबंद | ०१ |
| ४६ | Xerox Operator - झेरॉक्स मशीन चालक | ०१ |
| ४७ | Peon - शिपाई | १५ |
| ४८ | Chief food server - मुख्य भोजन सेवक | ०१ |
| ४९ | Cook - स्वयंपाकी | ०२ |
| ५० | Assistant to cook - स्वयंपाकी मदतनीस | ०४ |
| ५१ | Aya - आया | ०२ |
| ५२ | Sweeper - सफाई कामगार | ०२ |
| **एकूण** | | **१५८** |

******